# महाराष्ट्र शासन

**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.**

*शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.*

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Webside :- http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०


जा.क्र.विससं/उशि/कोविप/मशि/२०२०/ ९१० दिनांक : १९/०८/२०२०

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,

डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे,

के.व्ही. पेंढारकर कॉलेज आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स,

डोंबिवली (प.), ता. कल्याण, जि. ठाणे ४२१२०३.

**विषय :- नवीन विषय/अभ्यासक्रम Arts M.A. (Economics) संलग्नीकरीता प्रमाणपत्राबाबत...**

**संदर्भ :-** १. शासन आदेश क्रमांक एनजीसी २०२०/(१०४/२०)/मशि-४, दि. ३१ जुलै, २०२०.
२. आपले पत्र क्र. DSPM/२०२०-२१/०३०, दि. ०४/०८/२०२०.

उपरोक्त विषायाबाबतच्या संदर्भीय क्र. १ च्या आदेशान्वये आपल्या संस्थेच्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून **Arts M.A. (Economics)** या नवीन विषय/अभ्यासक्रमांना **(मा. उच्च न्यायालयाच्या या.क्र.५६७०/२०१९ मधील आदेश दिनांक १३.०६.२०१९ च्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्ताव विचारात घेण्यात आला आहे)** मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर नवीन विषय/अभ्यासक्रमास खालील अटी व शर्तीची पुर्तता करण्याच्या अधीन राहून प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत आहे.

१. शासन निर्णय दि. २ सप्टेंबर, २०१३ मधील निकषांची पुर्तता करण्याची जबाबदारी संस्था/महाविद्यालय यांची राहील.
२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करणे तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या तक्रारी व न्यायालयीन प्रकरणे यांविषयीचे उत्तरदायित्व स्विकारणे, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक त्या भौतिक सोयी-सुविधांची निर्मिती करण्याबाबतची जबाबदारी संस्था/महाविद्यालय यांची राहील.

**(डॉ. संजय जगताप)**
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत :- कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई -३२ यांना माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तव सादर.


Dombivli Shikshan Prasarak Mandal
Inward No. :- 300 Date :- 19/8/2020
Timing :- 3.20 pm Sign. :-

# महाराष्ट्र शासन

**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.**

*शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.*

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Webside :- http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०


जा.क्र.विससं/उशि/कोविप/मशि/२०२०/ ९१० दिनांक : १९/०८/२०२०

## प्रमाणपत्र

**प्रमाणित करण्यांत येते की, के .व्ही. पेंढारकर कॉलेज आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स डोंबिवली (प.) ता. कल्याण जि. ठाणे ४२१२०३ (मा. उच्च न्यायालयाच्या या.क्र.५६७०/२०१९ मधील आदेश दिनांक १३.०६.२०१९ नुसार विचारात घेण्यात आलेले) या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये शासन आदेश क्रमांक एनजीसी २०२०/(१०४/२०)/मशि-४, दिनांक :- ३१ जुलै, २०२० [अ. क्र. ३१] नुसार Arts M.A. (Economics) या नवीन विषय/अभ्यासक्रमांना उपरोक्त शासन मंजूरी आदेशातील अटी व शर्तींना अनुसरून कायम विना अनुदानित तत्वावर सुरू करण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे. शासन आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था/ महाविद्यालयाकडून रू. १००/- च्या भारतीय गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी केली जाणार नाही, असे हमीपत्र महाविद्यालयाकडून/ संस्थेकडून दिनांक- ०४.०८.२०२० अन्वये शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.**

**"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम - २०१६" अंतर्गत तरतुदीनुसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश तसेच प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या बिगतवारीसह नियतकालिक आढावा, नॅक ॲक्रिडीएशन बाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करणे तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या तक्रारी व न्यायालयीन प्रकरणे यांविषयीचे उत्तरदायित्व स्विकारणे, आवश्यक त्या भौतिक सोयी-सुविधांची निर्मिती करणे व तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता करणे या अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी आदेशातील मार्गदर्शक सूचना व प्रचलित नियमानुसार विद्यापीठाने या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नवीन महाविद्यालय/ विषय/ तुकडी/ विद्याशाखा/ अभ्यासक्रमासाठी पुढील संलग्निकरण्याची प्रक्रिया सुरू करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.**

**(डॉ. संजय जगताप)**
**विभागीय सहसंचालक,**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.**

**स्थळ :- पनवेल**
**दिनांक :- १९ /०८/२०२०.**

प्रत :-

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -३२ / एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - २० यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठांनी त्यांच्या संलग्निकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे / विद्याशाखांचे विहित शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबी व इमारत, वर्ग खोल्या, पुरेशी आसन व्यवस्था उ. बाबी पूर्ण करण्याच्या सूचना, तसेच शासन निर्णय २ सप्टेंबर, २०१३ मधील निकषांची पुर्तता करण्याची जबाबदारी संस्था/महाविद्यालय यांची राहील, याबाबत उपरोक्त संस्थेच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

उपरोक्त मान्यता नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय/ तुकडया सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी, **ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्षे झालेली नाहीत त्यांची ५ वर्षे पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रिडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल.** तसेच शासन निर्णयानूसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.